(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

रिट याचिका क्र. १०७९/१९७९

निकालाची तारीख : २९. ०४. १९८०

याचिकाकर्ता : प्रेम शंकर शुक्ला

**विरुद्ध**

उत्तरवादी : दिल्ली प्रशासन

माननीय न्यायाधीश / न्यायवृंद :

ओ चिन्नाप्पा रेड्डी , आर .एस . पाठक आणि व्ही . आर . कृष्णा अय्यर, न्यायमूर्ती

## न्यायनिर्णय

**न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा अय्यर**

1. "जेंव्हा त्यांनी माझ्या शेजाऱ्याला अटक केली तेंव्हा मी विरोध केला नाही. जेव्हा त्यांनी समोरच्या घरात पुरुष आणि महिलांना अटक केली तेव्हा मी विरोध केला नाही. आणि जेंव्हा ते शेवटी माझ्यासाठी आले, तेंव्हा विरोध करण्यासाठी कोणीही उरले नाही." - पोर्स्टर मीमोलर (निमोलर).

ही भीषण परिस्थिती आपल्या न्यायव्यवस्थेच्या चेतनेला पेटून टाकते, या प्रकरणातून निर्माण होणारी नैतिकता अशी आहे की, आज जर एका वंचित/निराधार/परित्यक्त व्यक्तीचे स्वातंत्र्य कुठेतरी पोलिसांच्या हाती लागले तर, उद्या अनेकांचे स्वातंत्र्य संपुष्टात येईल. खूप उशीर होण्याआधी जर न्यायालयीन प्रक्रिया वेळीच सुरळीत झाली नाही आणि पोलिसांवर नियंत्रण ठेवले गेले नाही तर कोणाचीही कुचंबणा होणार नाही. तिहार तुरुंगात बंदिस्त असलेल्या एका शुक्ला या कैद्याच्या एका तारेद्वारे सुरू झालेल्या या भविष्यवादी विचाराने सध्याच्या 'हेबियस' (बंदी) प्रक्रियेला चालना दिली आहे. त्यांनी पाठवलेला संक्षिप्त संदेश असा आहे :

*सुनील बत्रा विरुद्ध दिल्ली प्रकरणी न्यायालयाचा आदेश आणि मा . न्यायमूर्तींच्या निर्देशांना न जुमानता माझ्यावर आणि इतरांवर हातकड्या लादण्यात आल्या आहेत. बंदीप्रत्यक्षीकरणाची (हेबियस कॉर्पसची) रिट दाखल करून घ्यावी .*

हातकड्यांमुळे आणि बेड्यांमुळे जखमी झालेले असे लोक या तक्रारीकडे कदाचित दुर्लक्ष करू शकतात, परंतु मानवी प्रतिष्ठेची हमी, जी आपल्या राज्य घटनात्मक संस्कृतीचा एक भाग आहे, आणि कलम १४, १९ आणि २१ च्या सकारात्मक तरतुदी कृतीत उतरतात तेंव्हा आपल्याला हे समजते की मनुष्याला बेड्या घालणे हे त्याला मारण्यापेक्षा अधिक क्लेशकारक आहे; हे त्याला अमानवीय बनवणे आहे म्हणूनच, अनेकदा हे 'धोकादायक' आणि सुरक्षिततेचा मुखवटा वापरून त्याच्या व्यक्ति असण्याचेच उल्लंघन करण्यासारखे आहे. न्यायालय आणि वकिलांनी सारखेच व्यक्त केलेल्या याबद्दलच्या संवेदनशील दृष्टीकोनामुळे आम्हाला या मुद्द्याचे मूलभूत दृष्टिकोनातून परीक्षण करण्यास आणि याला कीव करा व सोडून द्या असे आणि दफन करण्यासारखे दररोजचे दृश्य म्हणून नाकारू नये, याकरिता प्रवृत्त केले आहे. वस्तुतः, आम्हाला माहिती देण्यात आली आहे की उच्च न्यायालयाने यापूर्वी या याचिकाकर्त्याची त्याच्या अंगावरील बेड्यांपासून मुक्त होण्याची मागणी फेटाळून लावली, की या प्रकरणाला आवश्यक असलेली घटनात्मक दखल प्राप्त झाली आहे, परंतु सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या प्रति-प्रतिज्ञापत्राच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या गोष्टींबाबत आम्ही समाधानी नाही. प्रति-प्रतिज्ञापत्राच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिल्ली प्रशासनाने सामान्य मार्गदर्शनासाठी पाठवलेला एक संदेश आहे आणि त्यात कायदेशीर सल्ला आणि कार्यकारी निर्देशांना प्राधान्य देण्यात आल्यामुळे त्याचे वाचन अस्वस्थ करणारे आहे आणि उच्च न्यायालयात अशाच प्रकारच्या सुटकेसाठी दाखल केलेल्या याचिकेचा उल्लेख आहे:

*दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती योगेश्वर दयाळ यांच्यासमोर ही याचिका सूचिबद्ध करण्यात आली होती. कारागृहातून न्यायालयात घेऊन जाताना आणि पुन्हा तुरुंगात नेताना हातकडी न घालण्याचे निर्देश देण्याची मागणी करणारी याचिकाकर्ते पी. एस. शुक्ला यांची याचिका माननीय न्यायालयाने युक्तीवाद ऐकल्यानंतर फेटाळून लावली. या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता, कुठल्याही निर्देशांची गरज नसल्याचे निदर्शनास आले. तथापि, माझ्या निदर्शनास असे आले आहे की, पंजाब पोलीस नियमावलीचा खंड ३, प्रकरण २५, नियम २६,२२,२३ आणि उच्च न्यायालयाचे नियम आणि आदेश खंड ३, प्रकरण २७, नियम १९ मधील आवश्यकतांचे पालन केले जात नाही. न्यायमूर्ती आर.एन. अग्रवाल यांनी दिनांक ६-४-१९७ रोजी मुख्य किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक ४३०/१९७८, विश्वनाथ विरुद्ध राज्य, मध्ये दिलेल्या निकालाकडे मी सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो, ज्यामध्ये असे निदर्शनास आले आहे की, एका चांगल्या श्रेणीत मोडणाऱ्या न्यायाधीन कैद्याला पोलिसांद्वारे न्यायालयात आणताना आणि बाहेर काढताना आवश्यकता असेल तर दैनंदिन डायरीत कारणे नोंदविल्याशिवाय हातकडी घातली जाऊ नये. असा कैदी हिंसाचाराचा वापर करेल किंवा त्याला सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल अशी वाजवी शक्यता असल्याशिवाय हातकड्यांचा वापर केला जाऊ नये. हातकड्यांच्या वापराची पद्धत वर नमूद केलेल्या नियमांनुसार पाळली जावी.*

सरळ भाषेत सांगायचे झाल्यास, याचा अर्थ असा आहे की, सर्वसाधारण भारतीय न्यायाधीन बंद्यांना तुरुंग आणि न्यायालय यांच्यातील प्रवासादरम्यान नियमितपणे

हातकड्या घातल्या जातील आणि चांगल्या श्रेणीतील कैदी हिंसक होण्याची किंवा त्याची सुटका होण्याची सकारण भीती वाटत असेल तरच त्याला अशाप्रकारे बंदिस्त केले जाईल.

२. बहुतांश वस्तुस्थिती वादातीत पलीकडे आहे आणि कायद्यावर चर्चा करण्यासाठी आणि त्याची घोषणा करण्यासाठी थोडक्यात वर्णन करणे आवश्यक आहे. आम्ही मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार करतो की कैदी देखील एक व्यक्ती आहे, एखादा जनावर नाही, आणि न्यायाधीन बंदी तर निश्चितच जनावर नाही. सुनील बत्रा यांचे प्रकरण एमएएनयू/एससी/०१८४/१९७८:१९७८क्रिमिनल एल जे १७४१ मध्ये स्पष्टपणे नमूद केल्याप्रमाणे आपल्या देशाचे संस्थापक दस्तऐवज (संविधान/राज्यघटना ) या विषयावर कोणतेही अपवाद नाही हे मान्य करते. या संकल्पनेच्या आधारे, कारागृहाच्या न्यायप्रणालीचा प्रवाह शुद्ध ठेवण्यासाठी कायद्याद्वारे अधिकृत केलेल्या सर्व उपाययोजना न्यायलयाने केल्या पाहिजेत.

३. वस्तुस्थितीचा संक्षिप्त गोषवारा आमच्यासमोर युक्तिवाद केलेल्या कायदेशीर समस्येचे निराकरण करण्यात मदत करू शकतो. एका कैद्याने या न्यायालयाच्या न्यायाधीशांना (आपल्यापैकी एकाला) त्याच्यावर आणि इतर कैद्यांना जबरदस्तीने हातकड्या लावल्याची तक्रार करून, तिहार तुरुंगात न्यायालयीन कोठडीत असलेल्या कैद्यांना त्यांच्या खटल्यांच्या सुनावणीसाठी दिल्लीच्या न्यायालयात नेण्यात येत असताना, त्यांना सार्वजनिक ठिकाणी जाहीरपणे, पाठीमागे आणि पुढे बेड्या बांधून त्यांचा अपमान आणि छळ केल्याच्या विरोधात निदर्शन करणारा तार पाठविला. याचिकाकर्त्याला बेड्या न लावण्याच्या न्यायालयाच्या आदेशानंतरही ही प्रथा कायम राहिली आणि याचा याचिकाकर्त्याला शोक वाटतो, त्यामुळे त्यांनी तारेद्वारे सुप्रीम कोर्टात सामुदायिक प्रार्थना केली. सर्वोच्च न्यायालय जे की मूलभूत

अधिकारांचे कार्यात्मक संरक्षक आहे तेथे बंदीसाठी असलेले न्याय (हेबियस) धोक्यात आहे. जर लोखंड (बेड्या) कायद्याच्या आत्म्यात आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांच्या आत्म्यात प्रवेश करत असेल-त्याऐवजी, जर विश्वासार्हपणे असे आरोप केले गेले असतील तर या न्यायालयाने प्रक्रियेचे स्वरूप (प्रकार) बाजूला सारले पाहिजेत आणि कलम १४,१९ आणि २१ अंतर्गत तक्रारदार व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण केले पाहिजे. मानवाला न्याय मिळवून देणे हे कलम ३२ चे सार आहे आणि या गतिमान दृष्टीकोनातून संवेदनशील होऊन आम्ही तथ्ये आणि कायदा आणि याचिकाकर्ता आणि दिल्ली प्रशासनाच्या प्रतिस्पर्धी आवृत्त्यांचे परीक्षण केले आहे. स्थानबद्धता विधीतत्वशास्त्रचे (डिटेन्शन ज्युरिस्प्रुडन्सचे ) अस्पष्ट क्षेत्र जिथे कैद्यांच्या सुटका रोखणे आणि कैद्यांचे व्यक्तिमत्व या बाबीच्या विचारांचा परिणाम संघर्षात होतो तेथे या स्वतंत्र प्रकरणापेक्षा अधिक शोध घेणे आवश्यक आहे. आणि दोन्ही बाजूंचे अधिवक्ता (डॉ. चितळे न्यायमित्र (ॲमिकस क्युरी) म्हणून, श्री मुदगल यांचे समर्थपणे सहाय्य, आणि राज्यासाठी श्री सचदे ) यांनी थोडक्यात मौखिक सहाय्य केले आहे आणि विस्तृत आधारावर लेखी निवेदने सादर केली आहेत. शेवटी, संबंधित वैधानिक तरतुदी आणि घटनात्मक आवश्यकतांबद्दल चर्चा करताना, न्यायालय आणि वकिलांनी मानवाधिकारांच्या सार्वत्रिक जाहीरनामा, १९४८ च्या अनुच्छेद ५ मध्ये नमूद मूळ तत्व कधीही विसरू नये.

> *कोणालाही यातना किंवा क्रूर, अमानवीय किंवा अपमानजनक वागणूक किंवा शिक्षेला सामोरे जावे लागणार नाही.*

आणि नागरी आणि राजकीय अधिकारांवरील आंतरराष्ट्रीय कराराचे अनुच्छेद १० वाचाः

४. अनुच्छेद १०: स्वातंत्र्यापासून वंचित असलेल्या सर्व व्यक्तींना मानवतेने आणि मानवी व्यक्तिमत्वाच्या जन्मजात/ अंगभूत प्रतिष्ठेच्या सन्मानाने वागवले जाईल.

५. अर्थात, या मोठया विचारांमुळे आपल्या विचारसरणीवर विशिष्ट रंग चढू शकतो, परंतु या खटल्यातील वास्तविक तथ्ये किंवा भाग ३ मधील निकष आणि कैद्यांमधील तरतुदी (न्यायालयातील उपस्थिती) कायदा, १९५५ (थोडक्यात, कायदा) यांना ओलांडू शकत नाही. आम्हाला जे म्हणायचे आहे त्याचा अर्थ एवढाच आहे की, जिथे वैयक्तिक स्वातंत्र्य धोक्यात आले आहे किंवा अत्याचार केला जात आहे, तिथे कायदा वाचून दाखवणे म्हणजे कायदा रद्द करणे आणि जर न्यायालयीन प्रक्रियेच्या आवाक्यात असेल तर बेड्या घातलेल्या (बंदिस्त) मनुष्याच्या उपचारात्मक मागणीसाठी उठणे म्हणजे मानवी बंधन तोडणे होय. तेव्हा या अधिकारक्षेत्रात, न्यायमूर्ती फेलिक्स फ्रँकफर्टरचे शब्द हे नाविकांच्या होकायंत्रासारखे आहेत:

> *स्वातंत्र्याचा इतिहास हा मुख्यतः प्रक्रियात्मक सुरक्षा उपायांचे पालन करण्याचा इतिहास आहे.*

*आणि मनेका गांधी विरुद्ध भारत संघराज्य, एम ए एन यू /एस सी/०१३३/१९७८:[१९७८] २ एस सी आर ६२१ मध्ये असे म्हटले आहेः*

> *अनुच्छेद २१ द्वारे संरक्षित वैयक्तिक स्वातंत्र्याची व्याप्ती व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. यात वैयक्तिक स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार आणि त्यांना वंचित ठेवण्याची प्रक्रिया या दोन्हींचा समावेश आहे.*

हातकडी हे उपकरण आहे का? असे असल्यास त्या पद्धतीला मान्यता कुठपर्यंत असू शकते ? हा कळीचा प्रश्न आहे.

६. कैद्याने तक्रार केली आहे की त्याला देखील बेड्या ठोकल्या गेल्या होत्या परंतु हे तथ्य विवादित आहे आणि काही काळासाठी हे बाजूला ठेवू या. या वस्तुस्थितीच्या चौकटीत

आपल्याला शुक्ला यांना बेड्यात बांधून ठेवणे हे योग्य होते का? याचा विचार करावा लागेल. उत्तरवादी या कायद्यातील तरतुदींवर आणि त्याअंतर्गत आणि पोलिस कायद्यांतर्गत तयार केलेले नियम यानुसार बेड्या घालणे कायदेशीर असण्यावर भर देतो. संविधानाच्या अनुच्छेद २१ वर मोठ्या प्रमाणावर भर दिलेल्या डॉ. चितळे यांच्या निवेदनांच्या प्रकाशात आणि अर्धशतकापासून वाढत चाललेल्या मानवी हक्कांशी संबंधित सामूहिक चेतनेच्या प्रकाशात ह्या याचिकेच्या घटनात्मक वैधतेसाठी बारकाईने निरीक्षण करावे लागेल.

७. याचिकाकर्ता हा खटल्यातील न्यायाधीन कैदी आहे, ज्याची अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयात उपस्थिती आवश्यक असते, त्यामुळे कारागृह आणि दंडाधिकारी न्यायालयांमध्ये वेळोवेळी फेऱ्या होणे अपरिहार्य ठरते. कोठडीत असल्यामुळे तो पळून जाण्याचा प्रयत्न करू शकतो आणि त्यामुळे ताब्यातील व्यक्तींना पळून जाण्यापासून रोखणे हे अनुरक्षकांचे आवश्यक कर्तव्य ठरते. अनुरक्षकांनी त्यांच्या ताब्यातील व्यक्तींना पळून जाण्यापासून काळजीपूर्वकरित्या रोखतानाही त्या कैद्यांच्या व्यक्तिमत्वाचा आदर राखला पाहिजे. येथेच मानवी अधिकार विषयक न्यायशास्त्राची पेंच निर्माण होते. प्रवासादरम्यान कैद्याच्या अंगावर अभिरक्षकाने बेड्या घालाव्या का? की हातकड्या घालाव्या किंवा साखळ्या किंवा साखळदंड घालावे? अशा प्रकारची आघातापूर्वक वागणूक घटनादत्त अधिकारांच्या एरव्ही अभेद्य क्षेत्रात शिरकाव कधी करतात? शिस्तपालनाचे उपाय संपून क्रूर छळ कधी सुरू होतो? काय आहेत घटनात्मक मापदंड, व्यवहार्य मार्गदर्शक तत्वे आणि व्यावहारिक धोरणे ज्यामुळे कारावासातील परिस्थिती आणि मूलभूत प्रतिष्ठेचे शांततापूर्ण सह-अस्तित्व शक्य होईल? या कौशल्यांवर निर्णय घेताना निर्णयात्मक लक्ष केंद्रित केले जाते आणि प्रलंबित खटल्यांमुळे अनेक वर्षांपासून तुरुंगात खितपत पडलेल्या हजारो व्यक्तींवर याचा परिणाम होतो. बेड्या मध्ये

खितपत पडलेले असे अनेक शुक्ला हे आपल्यासमोरील अदृश्य पक्षकार आहेत जे या समस्येला एक महत्वाचा विषय बनवतात. आम्ही डॉ. चितळे आणि त्यांचे कनिष्ठ सहकारी मुदगल जे न्यायमित्र म्हणून उपस्थित झाले आणि कायद्याच्या धुसर क्षेत्राला प्रकाशित केले, यांनी बजावलेल्या सेवेचे आम्ही कौतुक करतो, आणि राज्यासाठी हजर राहिलेल्या आणि संपूर्ण माहिती देणाऱ्या श्री सचदे यांच्या सहकार्य व सेवेचे आम्ही कौतुक करतो.

८) याचिकाकर्त्याचा दावा आहे की तो एक 'उत्तम दर्जाचा' कैदी आहे, ही वस्तुस्थिती मान्य केली गेली आहे, जरी कलम १४ च्या समतावादी संदर्भात कैद्यांमध्ये अर्ध-जाती व्यवस्था कशी असू शकते हे समजण्यात अपयश आले. संपत्ती आणि परिस्थितीवर आधारित भेदभावपूर्ण वागणूक भारतीय तप्त सूर्याखाली तग धरू शकत नाही, हे जीवनातील एक कटू सत्य आहे. आम्हाला आशा आहे की गृह मंत्रालय आणि कारागृह प्रशासन या अभेद्य फरकाच्या कायदेशीर मृत्यूनंतर जिवंत राहण्याची योग्य ती दखल घेईल आणि जोपर्यंत आरोग्य, वय, शैक्षणिक किंवा व्यावसायिक गरजा यावर आधारित तर्कसंगत वर्गीकरण होत नाही तोपर्यंत सर्व कैद्यांना समान पायावर ठेवतील. संपत्ती, राजकीय महत्त्व, सामाजिक दर्जा आणि घटनात्मक आचारसंहितेच्या विरोधी पदानुक्रमित सामाजिक संरचनेचे जुने नियम असलेल्या इतर निकषांसारखे कायदेशीर आधार आणि असंबद्ध नाही. सध्याच्या नियमांनुसार, याचिकाकर्ता एक चांगला वर्ग कैदी आहे आणि त्या कारणासाठी काही फायदे मिळवण्यासाठी आणि हतकड्यांपासून मुक्ती मिळवण्याबाबत दावा करतो. राज्यांच्या कथनानुसार दिल्ली च्या न्यायालयामध्ये अनेक प्रकरणे आहेत ज्यात याचिकाकर्ता हवा आहे.प्रतिवादींना, तो एक आंतरराज्यीय लबाडी करणारा आणि अतिशय चालाक आहे आणि कोठडीतून पळून जाण्यासाठी त्या उद्देशाने धाकदपटशा करणारा आणि गैरवर्तन करणारा आहे असे वाटते

.अर्थात, याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की, त्याची सामाजिक स्थिती, कौटुंबिक पार्श्वभूमी आणि शैक्षणिक पात्रता यामुळे त्याला अधिक चांगल्या श्रेणीतील कैदी म्हणून वागणूक दिली जावे .व पुढे म्हणतो की, त्याला हातकडी घालू नये, असेही निर्देश कोर्टाने दिले होते, होते, तो असेही म्हणतो की, संबंधित नियमांतर्गत चांगल्या श्रेणीतील कैद्यांना हातकड्यापासून सूट देण्यात आली व त्यांच्या समर्थनार्थ दिल्ली उच्च्य न्यायालयाचा दृष्टिकोनाचा दाखला देतोकी, दैनंदिन रोजनिशीत हातकडीचा वापर करण्याची आवश्यकता नोंदिवल्याशिवाय चांगल्या श्रेणीतील कैद्यांना हातकडी घालू नये.   उच्च न्यायालय (राज्याच्या वतीने प्रतिज्ञापत्रातील परिशिष्ट अ) असे निरीक्षण नोंदवले आहे की जोपर्यंत हिंसाचाराची वाजवी अपेक्षा किंवा सुटका करण्याचा प्रयत्न होणे वाजवीरित्या अपेक्षित असल्याशिवाय  कैद्याला हातकडी लावता कामा नये.

९) असे असले तरी, उच्च न्यायालयाच्या आदेशाव्यतरिक्त खटल्यातील न्यायाधीश (श्री ए. के. गर्ग) यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आणि आरोपींना तुरुंगातून न्यायालयात आणि माघारी नेत असताना आवश्यक असल्याशिवाय हातकडी लावू नये  असे निर्देश दिले होते .

> *....मी असे निर्देश देतो की आरोपींना तुरुंगातून न्यायालयात आणि परत घेऊन जाताना संबंधित अधिकाऱ्यांनी, चांगल्या श्रेणीतील कैद्यांना लागू असलेल्या नियमानुसार आणि जर परिस्थितीच्या अत्यावश्यकतेनुसार आवश्यक असेल तरच संबंधित नियमाच्या अंतर्गत त्यांना हातकडी लावण्याचा अवलंब करावा लागेल.*

न्यायालयीन आदेशाकडे दुर्लक्ष करून उच्च पोलीस आदेशानुसार प्रवासादरम्यान त्याला बेड्या घालण्यात आल्या आणि म्हणूनच ही बंदी प्रत्यक्षीकरण याचिका दाखल झाली आणि या न्यायालयाने डॉ. वाय. एस. चितळे  यांची न्यायमित्र म्हणून नियुक्ती केली.वकिलांचे  काम

फलदायी बनवण्यासाठी तुरुंग अधिकाऱ्यांना योग्य निर्देश दिले आणि पुढील कारवाई करण्यापूर्वी राज्याला नोटीस बजावली.प्रत्येक डोळ्यातील प्रतेक्ष्य अश्रू पुसणे याला एक न्यायालयीन आयाम आहे.येथे एक कैदी आहे जो कडवटपणे तक्रार करतो की 'न्यायालयात नेले जात असताना आणि न्यायालयाचे आवाहन करताना त्याला सार्वजनिकपणे हातकड्या घातल्या गेल्या आहेत. त्याच्या व्यक्तीच्या निष्ठेचे आणि त्याच्या मानवतेच्या प्रतिष्ठेचे संवैधानिक प्रिस्क्रिप्शनच्या विरुद्ध कोठडीतील क्रूरतेपासून संरक्षण करण्याच्या न्यायालयाच्या शक्तीला प्रवृत्त करते.

१०) तुरूंगाच्या अधीक्षकांनी सांगितले की, न्यायालयातून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहतुकीशी त्यांचा काहीही संबंध नाही आणि दिल्ली प्रशासनाचे अधिवक्ता सचदे यांनी स्पष्ट केले की, कैद्यांना पोलीस कोठडी परिसर आणि न्यायालय यांच्यामध्ये नेणे ही पोलिसांच्या विशेष शाखेची जबाबदारी आहे.कैदी जेव्हा सुरक्षेसाठी धोकादायक असतो, तेव्हा कायद्याच्या अशा बंद्याला हातकड्या घालण्याचे कायद्याला वावडे नसतात आणि नियम त्याच्या वापराला परवानगी देतात, असे त्यांनी सांगितले.याचिकाकर्ता एक चालाक बदमाश होता आणि प्रलोभनाने देवुन तो हवालदाराला मूर्ख बनवून पळून जायचा.लोखंडाला मूर्ख बनवणे अवघड असल्याने त्याला हातकड्या घालण्यात आल्या. कैद्याची सुरक्षा ही अनुरक्षक पोलिसांची जबाबदारी असल्याने संपरीक्षा न्यायालयाचा आदेश आंधळेपणाने बंधनकारक नव्हता. नियमांमध्ये असे नमूद केले आहे आणि ह या स्पष्टीकरणा आधारे पोलिसांना निर्दोष ठरविले पाहिजे.संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या उत्तरात अनेक तपशीलांचा उल्लेख करण्यात आला आहे आणि जिथे तिथे आवश्यक असेल तिथे त्याचा संदर्भ दिला जाईल परंतु जो अतिशय कठोर शब्दात केला आहे की जेव्हा सुरक्षेचा प्रश्न कडक भूमिका घेतो तेव्हा मानवी प्रतिष्ठेचे सर्व सौम्य बोलणे हद्दपार

होते. सहजच सुरक्षा विरुद्ध मानवतेच्या कुठल्याही संयुक्त प्रश्नाचे उत्तर वाढले खनक देता येत नाही. हा गंभीर मुद्दा विचारात घ्यावा यासाठी आम्हाला वकिलानी  पटवून दिले आहे कारण हे वारंवार घडते आणि सुरक्षा अधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या मानवी आरोपांच्या फायद्यासाठी कायदा स्पष्ट केला पाहिजे.डॉ.  चितळे यांचा युक्तिवाद असा आहेः मानवी अधिकार हा शांत ध्यानस्थ व निरर्थक संविधानात्मक बडबड नाही तर राष्ट्राच्या स्थापनेच्या सनदेचा  संवेदनशील चैतन्याचा भाग आहे. कोणताही कैदी कायद्यापेक्षा लहान नाही आणि जेव्हा कैदे दरम्यान न्यायालयाने उपस्थिती आवश्यक केल्यानंतर च्या प्रवासाचे नियम कायद्यात दिले आहेत तेव्हा त्याचे विवेचन मानवाधिकाऱ्यांच्या व्यापक पार्श्वभूमीवर झाले पाहिजे.

११)  येथे एक कैदी व याचिकाकर्ता आहे जो नियमित, सार्वजनिक, अश्लील आणि अन्यायकारक कारागृह आणि न्यायालयाच्या प्रवासा दरम्यान हातकडीचा विरोध करतो आणि आपल्या कायदेशीर कोठडीच्या मर्यादित परिस्थितीत या न्यायालयाच्या रिट अधिकार क्षेत्र क्षेत्राचा वापर करतो.आम्ही घटनेच्या भाग ।।। च्या मानवी हक्क निकषांच्या अंतर्गत,  संबंधित आंतरराष्ट्रीय सनदा  आणि करारांनी सूचित केलेल्या कोठडीतील  क्रूरता आणि अपमानास्पद वागणुकीच्या विरोधात कैद्यांच्या अधिकारांच्या गंभीर मुद्यांची चौकशी केली पाहिजे.मानवी गुलामगिरीचा मूळ स्थितीत असलेला  इतिहास आणि बंदी प्रतीक्षीकरण प्रात्यक्षिकरन  रिटची मुळे बेकायदेशीर नजरकैदेत असलेल्या पुरुषांच्या संख्येत वाढ करण्यासाठी घटनात्मक शक्तीचा सुज्ञपणे वापर करण्यावर प्रकाश टाकतात.हा लेखादेश आता इंग्रजी न्यायतत्वाच्या पारंपारिक मर्यादामुळे थरथरणार नाही कारण आमच्या राष्ट्र संस्थापकानी अधिक व्यापक प्रमाणात शक्तीची व्याख्या करून विशेषाधिकार लेखाची प्रेरणा अधिव्याप्त  केली आहे. म्हणूनच, भारतात, अमेरिकेतील समान अधिकारक्षेत्राप्रमाणे, बेकायदेशीर कोठडीतून

सुटण्याच्या कक्षेच्या पलीकडे, कायदेशीर कोठडीत असलेल्या व्यक्तींवर होणाऱ्या प्रत्येक आघात आणि छळात, बंदी प्रत्यक्षीकरण विस्तृत क्षितिजे पसरलेली आहेत, जर क्रौर्य कायद्याच्या विरुद्ध असेल, मानवी प्रतिष्ठेचा ऱ्हास करत असेल किंवा त्याच्या व्यक्तिमत्त्वाला अशा प्रमाणात अपवित्र करते जे प्रस्तावनेद्वारे जिवंत केलेल्या कलम २१ , १४ आणि १९ चे उल्लंघन करते.

१२). याचिकाकर्त्याच्या कोठडीची वैधता हा थेट मुद्दा नाही परंतु, कायदेशीर नजरकैदेच्या बंधनांनी मर्यादित असला तरी, माणसाचे माणूस म्हणून वैशिष्ट्ये जे कि सर्व स्थिर आणि अविभाज्य आहे, त्यानुसार याचिकाकर्त्याला घटनादत्त महान अधिकार प्राप्त होतो.

१३). सुनील बुत्रा यांच्या प्रकरणात (वरीलप्रमाणे) या न्यायालयाच्या घटनापीठाने असे नमूद केले आहे की तुरुंगवास म्हणजे कैद्याला मूलभूत अधिकार हीन करणे असा होत नाही.

१४) याचिकाकर्त्याला अनेकदा हातकडी घालण्यात आली होती, यात काही शंकाच नाही.पुन्हा हे मान्य केले जाते की, याचिकाकर्त्याला ६-१०-१९७९ रोजी पोलीस निरीक्षकाच्या आदेशानुसार हातकडी बांधण्यात आली होती , ज्यांची कारणे परिशिष्ट ई मध्ये नमूद केली आहेत, ती अस्पष्ट आणि अप्रमाणित आहेत, अगदी अनिश्चित देखील आहेत.

१५) उत्तरवादीच्या अधिवक्ता त्यांच्या लेखी निवेदनात म्हटले आहे की याचिकाकर्ता अनेक प्रकरणांमध्ये सहभागी आहे.पण हे केवळ कैद्याला हातकडी घालण्याचे कारण होऊ शकत नाही .पोलीस अधिकारी कैद्यांच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळतात आणि त्यांना हातकडी घालण्याचा अधिकार त्यांच्याकडे आहे, हा दावा केवळ कायदा आणि नियमांच्या संदर्भात नव्हे तर संविधानाच्या कलमांच्या संदर्भात सिद्ध केला पाहिजे, असा युक्तिवाद त्यांनी केला.आपण

आधी कायदा बनवू आणि मग त्या कायद्याची चाचणी घटनात्मकतेच्या कसोटीवर तपासून घेऊ .

१६) या कायद्याच्या कलम ९ (२) (ई) नुसार तुरुंगात असलेल्या आणि ज्या न्यायालयांमध्ये त्यांची हजेरी आवश्यक आहे अशा न्यायालयांपर्यंत आणि अशा हजेरीच्या कालावधीत त्यांच्या ताब्यात असलेल्या व्यक्तींच्या संरक्षणासंदर्भात नियम बनवण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत.पंजाब पोलीस नियम, १९३४ (खंड 3) मध्ये काही संबंधित तरतुदी आहेत.त्यांचा सारांश येथे काढता येईल.

> *२६.२२(१) खालील श्रेणीतील प्रत्येक पुरुष व्यक्ती ज्याला पोलिस अनुरक्षणात सोबत घेऊन जावे लागते आणि जर पोलिस अटकेत असेल, रिमांडच्या अटी ज्यामध्ये वापरल्या गेल्या असतील, त्यानुसार वयोमान परत्वे हातकडी घालण्याचा प्रभावी प्रतिकार करण्यात असमर्थ असेल तर अटक केल्यानंतर ज्या इमारतीतून त्याला नेले जाऊ शकते त्या इमारतीतून काढून टाकणे :*

(क) अजामीनपात्र गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्तींना तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

(ख) भारतीय दंड संहितेच्या कलम १४८ किंवा २२६ अंतर्गत दंडनीय गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्ती.

(ग) भारतीय दंड संहितेच्या कलम ७५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठी आरोपी आणि पूर्वी दोषी ठरवलेल्या व्यक्ती.

(घ) आततायी व्यक्तिमत्व .

(ई) हिंसक, अव्यवस्थित किंवा अडथळा आणणारी किंवा लोकप्रिय निदर्शने करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने कृती करणारी व्यक्ती.

(च) ज्या व्यक्तींनी पळून जाण्याचा किंवा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे किंवा त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला आहे.कैद्यांना रस्त्याने किंवा वाहनातून घेऊन जाताना हा नियम लागू असेल.

(२) उत्तम दर्जाच्या खटल्यातील कैद्यांना हातकडी तेव्हाच लावावी जेंव्हा ते सुरक्षित संरक्षणासाठी आवश्यक समजले जाते.जर (क), (ख) आणि (ग) या उप-नियमातील कारणांव्यतिरिक्त इतर कारणांमुळे चांगल्या श्रेणीतील कैद्याला हातकडी घातली गेली तर जबाबदार अधिकाऱ्याने स्टेशन डायरीमध्ये किंवा इतर योग्य कागदपत्रांमध्ये हातकडीचा वापर करण्याची कारणे नमूद करावीत.

या परिच्छेदामध्ये (अ) ते (फ) या कोणत्याही अटींची पूर्तता झाल्यास अटकेवरील नियमित सराव म्हणून हातकडीला परवानगी देण्यात आली आहे.उत्तम दर्जाच्या कैद्यांना अधिक सन्मानजनक वागणूक या अर्थाने दिली जाते की, सुरक्षित अभिरक्षणासाठी आवश्यक असल्याशिवाय त्यांना हातकडी घातली जाणार नाही. शिवाय, जेव्हा चांगल्या दर्जाच्या कैद्यांना हातकडी घातली जाते तेव्हा संबंधित अधिकाऱ्याने हातकडीचा वापर करण्याची कारणे नोंदवावी.

नियम २६.२१ -अ मध्ये उत्तम श्रेणी कैद्यांची व्याख्या केली आहे, जी येथे देखील दिली जाऊ शकते -

*२६.२१-ए. आधीच्या राहणीमानाच्या आधारे चाचणी अंतर्गत कैद्यांना दोन वर्गांमध्ये विभागले गेले आहे. वर्गीकरण प्राधिकरण हे जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या मान्यतेच्या अधीन*

*असलेले खटले न्यायालय आहे, परंतु ट्रायल कैद्यांसमोर कैद्यांचे वर्गीकरण करण्यापूर्वीच्या कालावधीत. सक्षम न्यायालय, पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याने विवेकाचा वापर केला जाईल, त्याला एकतर 'उत्तम वर्ग' किंवा 'सामान्य' म्हणून वर्गीकृत करा.*

ज्या कैद्यांना सामाजिक दर्जा, शिक्षण किंवा जीवनशैलीच्या सवयीमुळे उच्च जीवनशैलीची सवय आहे अशाच कैद्यांना 'उत्तम वर्ग' म्हणून वर्गीकृत केले पाहिजे.कुठल्याही विशिष्ट वर्गाच्या गुन्ह्यासाठी कैद्यावर खटला चालवला जाणार आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेण्याजोगी नाही.काही प्रमाणात साक्षरता असणे हे 'उत्तम वर्ग' वर्गीकरणासाठी पुरेसे नाही आणि ज्या कैद्यांचे राहणीमान संबंधित पोलिस अधिकाऱ्याला सामान्य लोकसंख्येपेक्षा चांगले वाटत नाही, मग ते शहरी असो किंवा ग्रामीण, अशा कोणत्याही कैद्याचे असे वर्गीकरण करता येणार नाही.नियम २६.२१- (१) मध्ये 'अ' आणि 'ब' श्रेणीतील दोषी कैद्यांसाठी विहित प्रमाणेच 'उत्तम वर्ग' म्हणून वर्गीकृत केलेल्या खटल्यातील कैद्यांना आहार दिला जाईल.

सामान्य आणि चांगल्या श्रेणीतील कैद्यांमधील झालेले व्दिभाजन त्यांना उपभोगत असलेल्या सुविधांशी सुसंगत आहेत आणि त्यांना बांधलेल्या हातकड्यांचा देखील हा परिणाम असू शकतो. सामाजिक स्थिती, शिक्षण, सामान्य लोकसंख्येपेक्षा उच्च राहणीमान ह्या सीमांकन चाचण्या आहेत.

१७. परिच्छेद २७.१२ असे निर्देश देतो की हातकडी घालून न्यायालयात आणले जाणारे कैदी हातकडी मध्येच ठेवावे जोपर्यंत ते काढून टाकण्याचे "विशेषतः पीठासीन अधिकाऱ्याने आदेश

दिलेले नाही", म्हणजेच असे म्हणता येईल की, कोर्टातही हातकडी  हा नियम आहे आणि काढून टाकणे हा अपवाद आहे.

१८. आपण सुधारित पोलिस सूचना आणि कैद्यांना हातात हातकडी बांधण्यासाठीची  स्थायी आदेश जाहिर करू शकतो. कारण सुरक्षारक्षक अधिकारी या आदेशांना शास्त्रवचनीय अधिकार मानतात."

स्थायी आदेश 44 मध्ये असे म्हटले आहे की  :

(१) राजकीय कैद्यांना व इतरांना हातकडी लावण्याबाबतचे नियम पोलीस नियम १८.३०, १८.३५, २६.२२, २६.२३ आणि २६.२४ मध्ये दिलेले आहेत. या तरतुदीचे अवलोकन  करून काळजीपूर्वक अभ्यास केल्यास असे दिसून येते की एखादी व्यक्ती गंभीर अजामीनपात्र गुन्ह्यांमध्ये सामील असेल, आधीचा दोषी असेल, हताश असेल, हिंसक, अव्यवस्थित किंवा अडथळा आणणारी असेल किंवा आत्महत्या करण्याची शक्यता असेल किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करेल तर हातकड्यांचा वापर केला पाहिजे.

(२) भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या दिनांक २६-७-५७ च्या पत्र क्रमांक २/१५/५७-पी-४ आणि दिनांक ८/०७/७४-जीपीए-१ च्या दिनांक ८-११-७४ च्या निर्देशांनुसार, ज्यांच्या प्रत या मुख्यालयाच्या दिनांक ३-९-७६ च्या अखेरच्या क्रमांक १९१४३-२९३/सी अँड टी च्या माध्यमातून सर्व संबंधितांना पाठवण्यात आल्या होत्या, अशा ठिकाणी सामान्यतः आरोपी/कैदी हिंसक, अव्यवस्थित, अडथळा निर्माण करणारा किंवा पळून जाण्याचा किंवा आत्महत्येचा प्रयत्न करण्याची शक्यता

असलेल्या किंवा काही गंभीर अजामीनपात्र गुन्ह्यांचा आरोप असलेल्या कैद्यांनाच हातकड्यांचा वापर करावा लागतो.

(३) x x x

(४) असे निदर्शनास आले आहे की, प्रत्यक्ष व्यवहारात पोलिसांनी अटक केलेल्या कैदी/व्यक्तींना हातकड्या घातल्या जातात. हे काटेकोरपणे त्वरित केले गेले पाहिजे.

(५) हातकड्यांचा नित्यक्रमात वापर करू नये.त्यांचा वापर फक्त अशा ठिकाणी केला जाईल जिथे ती व्यक्ती हताश, गुंड असेलकिंवा अजामीनपात्र गुन्ह्यात सहभागी असेल.सार्वजनिक जीवनात चांगल्या सामाजिक पदावर असलेल्या व्यक्तींना किंवा कायदेतज्ज्ञ, वकील, डॉक्टर, लेखक, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रसिद्ध पत्रकारांसारख्या व्यावसायिकांना सहसा कोणतीही हातकडी घालण्याचे कारण असू नये. ही एक सर्वोत्तम उदाहरणादाखल दिलेली यादी आहे. अर्थातच ती संपूर्ण असू शकत नाही.या सूचनांच्या मागची भावना आपण समजून घेतली पाहिजे.या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे की नाही हे पाहणे विविध स्तरावरील पर्यवेक्षक अधिकारी, मुख्यत्वे एसएचओ यांचे कर्तव्य असेल.या सूचनांचे पालन न केल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी.

उपकलम (6) मध्ये प्रक्रियात्मक सुरक्षा आहेः

(६) पोलिस स्टेशनच्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी हे देखील सुनिश्चित केले पाहिजे की आरोपीला पोलिस स्टेशनमध्ये आणताना किंवा पाठवताना, त्याला कोठे हातकडी घालण्यात आली होती किंवा कारणांसह हातकडी लावण्याचे कारण संबंधित दैनिक डायरीच्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. पोलीस ठाण्याचे एसएचओ आणि उपविभागाचे एसीपी वेळोवेळी संबंधित

दैनंदिन डायरीची तपासणी करतील आणि पोलिस ठाण्यातील कर्मचारी या सूचनांचे पालन करत आहेत की नाही हे पाहतील.

१९. राजकीय कैद्यांना, जर हातकडी घातलेली असेल, तर त्यांना रस्त्यावरून फिरता कामा नये (उप-परा 7) आणि तसे, इतरांना लागू केले जाऊ शकते.

२०. हे आदेश एप्रिल १९७९ चे असून १९७२ चे आदेश रद्द करण्यात आले आहेत. नोव्हेंबर १९७७ च्या बेड्यां घालण्याबाबतच्या सूचनांची निष्पक्षपणे पुनरावृत्ती केली जाऊ शकतेः

प्रत्यक्षात असे आढळून आले आहे की बेड्यांचा वापर 3 वर्षांपेक्षा कमी कारावासाची शिक्षा असलेल्या गुन्ह्यांचा आरोप असलेल्या न्यायाधीन बंदीसाठी केला जात आहे जो P.P.R च्या निर्देशांच्या विरुद्ध आहे. जोपर्यंत न्यायाधीन बंद्याला बेड्या घालणाऱ्या अधिकाऱ्याकडे असे विश्वास ठेवण्याची कारणे असते की बेड्यांचा वापर केला गेला, कारण न्यायाधीन बंदी हिंसक, उच्छृंखल किंवा अडथळा आणणारा होता किंवा लोकप्रिय निदर्शनांना चिथावणी देण्यासाठी कारणीभूत ठरलेला होता किंवा अधिका-याला अशी भीती आहे की बेड्या घातलेली व्यक्ती पळून जाण्याचा किंवा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करेल किंवा अशा प्रकारचे कोणतेही कारण असेल तेव्हा त्याने बेड्या घाल ण्यापूर्वी आणि जेथे उपलब्ध असेल तेथे त्याचा अहवाल दैनंदिनी मध्ये नोंदवावा.

२१ . वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे आणि बेड्यांचा वापर करण्यापूर्वी बे ड्यांच्या वापरासाठीच्या सर्व औपचारिकता पूर्ण केल्या पाहिजेत.

२२. हातकडी कायद्यातील या तरतुदीचे संकलन कलम 14, 19 आणि 21 च्या निकषांची पूर्तता करणारे असणे गरजचे आहे. सोबराज प्रकरणात सुनील बत्रा विरुद्ध दिल्ली प्रशासन मनु/एससी/०१८४/१९७८ :१९७८ क्रिमिनल लॉ जनरल १७४ मध्ये कैद्याला बेड्या घालणे या

न्यायालयाद्वारे घटनात्मक छाननीच्या अधीन होते. त्याचप्रमाणे,न्यायाधिन बंदीना बेड्याची सक्ती करणे तिहेरी कलमांच्या मानवी आवश्यकतांच्या अनुषंगाने असले पाहिजे.अधिकृत क्रूरता, कोणत्याही घटनात्मकतेशिवाय, गुन्हेगारीत रूपांतरित होते.नियम, स्थायी आदेश, सूचना आणि परिपत्रके राज्यघटनेच्या तिसऱ्या भागाच्या अधीन असणे आवश्यक आहे. म्हणून पहिले कार्य म्हणजे या कलमांनी निश्चित केलेल्या मर्यादांचे मूल्यांकन करणे हे आहे.

२३. प्रस्तावनेत मूलभूत दस्तऐवजाचा मानवी सूर आणि स्वभाव मांडण्यात आला आहे आणि न्याय, समानता आणि व्यक्तीचा सन्मान यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.कलम १४ भेदभावपूर्ण व्यवहार आणि क्रूरता यावर अडथळा आणते.कलम 19 मध्ये सर्वसामान्य जनतेच्या हिताशिवाय मुक्त हालचालींवर निर्बंध घालण्यात आले आहेत. मेनका गांधी मेनका गांधी विरुद्ध भारतीय संघ एम ए एन यू /एस सी /०१३३ /१९७८: [१९७८ ] 2एससीआर६२१त्यानंतर सुनील बत्रा (उपरोक्त) मधील ऐतिहासिक प्रकरणानंतर अनुसरण केले गेले की कलम २१ मानवी मूल्यांचा गाभा आहे तो न्याय्य प्रक्रिया निर्धारित करतो आणि अमानुषतेला दंडात्मक किंवा प्रक्रियात्मक प्रतिबंध करतो. जर आपण व्यापकीकरण केले तर ते असे आहे.

२४ . हातकडी घालणे सकृतदर्शनी अमानवीय आहे आणि म्हणूनच ते अवास्तव, अति कठोर असुन प्रमुख्याने अवाजवी, अराजक आहे. योग्य प्रक्रिया आणि वस्तुनिष्ठ देखरेखीचा अभावी बेड्या लादणे म्हणजे कलम 21 च्या विरोधात प्राणीशास्त्रीय धोरणांचा अवलंब करणे.म्हणूनच, या प्रतिरोध पद्धतीसाठी राज्याने देऊ केलेल्या समर्थनाचे आपण नि:पक्षपातीपणाने परीक्षण केले पाहिजे.कैद्याला पळून जाण्यापासून आणि त्याच्या व्यक्तिमत्वाचे अमानुषतेपासून रक्षण करण्याच्या स्पर्धात्मक दाव्यांमध्ये निश्चितच सुसंवाद असणे आवश्यक आहे.संपरीक्षा कैद्यांना पळून जाण्यापासून रोखणे हे हितसंबंधाचे आहे, वाजवी, न्याय्य आणि स्वतःहून टीका केली

जाऊ शकत नाही.परंतु एखाद्या माणसाला हातापायाला बांधणे, त्याच्या पायाला पोलादाच्या बेड्या घालणे , त्याला रस्त्याने फरफटत नेणे आणि तासनतास न्यायालयात उभे करणे म्हणजे त्याचा छळ करणे, त्याची प्रतिष्ठा मलिन करणे हे सामाजिक असभ्यते बरोबरच आपल्या संविधानिक संस्कृतीचा च्या आत्माला कलंक लावणे आहे. छापील आणि रूढ प्रघात नियम किती चुकेचे आहेत मग मग आपण मानवी रेषा कुठे रेखाटणार?

